# महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीचा अभ्यास

**डॉ. सुहास सखाराम पाठक**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**अर्चना प्रल्हाद झाकडे**
संशोधक विद्यार्थीनी, शिक्षणशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**सारांश**

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीचा अभ्यास यामध्ये करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे १५ स्वायत्त महाविद्यालये निवडण्यात आली होती. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता. त्याचबरोबर माहीती संकलनासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित साधनांचा उपयोग केला होता.

उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी उच्च शिक्षणप्रणालीत बदल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यातीलच स्वायत्त महाविद्यालय हा एक होय. महाराष्ट्र हे राज्य सर्वच बाबतीत आघाडीवर असले तरी स्वायत्त महाविद्यालयाच्या बाबतीत इतर राज्यांच्या तुलनेत मागे असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात १९९५ सालापासून स्वायत्त महाविद्यालयास सुरुवात झाली. स्वायत्त महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीत काळानुसार विविध बदल करणे अपेक्षित असते. स्वायत्त महाविद्यालयाने स्थानिक स्तरावर स्वतःचे अल्पकालावधी, दिर्घकालावधी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करावेत, अध्ययन व अध्यापनाच्या अद्ययावत पद्धती व साधनांचा वापर, मूल्यमापनाच्या सातत्यपूर्ण व सर्वंकष पद्धतीचा अवलंब करावा आणि विविध नवोपक्रम राबवून उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढवून त्यात सातत्य ठेवावे यासाठी स्वातंत्र्य दिले जाते.

**स्वायत्तता म्हणजे अध्ययन -**

अध्यापनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी अध्ययन वातावरण पुरविणारी नियोजनद्ध संरचना असते. ज्यामध्ये समस्येचे समाधान समाविष्ट असते. म्हणजेच अध्ययन - अध्यापनाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी व अध्यापनाला चालना देण्यासाठी विविध अध्ययन - अनुभव देता यावे यासाठी केलेली आवश्यक ती वातावरणनिर्मिती होय.

विद्यार्थी प्रवेशाचे नियम ठरविण्यापासून ते परीक्षांचे निकाल लावणे, पदक व बक्षिस देण्याचेही स्वातंत्र्य स्वायत्त महाविद्यालयांना असते. शिक्षणक्षेत्रात उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तात्काळ निर्णय घेवून अंमलबजावणी करावी लागते. तसेच बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांमध्ये अनेकविध कौशल्य विकसित करण्याची गरजही पूर्ण केली जावू शकते.

महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयात विविध बदल करण्यात आले आहेत. स्वतःचे विद्यार्थी प्रवेशाचे नियम ठरवत असतानाच राज्य सरकारच्या आरक्षित धोरणाचाही विचार करावा लागतो. आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम बदलण्याबरोबरच काळानुसार नवनवीन कोर्सेसची सुरुवात करावी लागते. तसेच प्राध्यापकांची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपक्रम राबवावे लागतात. अद्ययावत अध्ययन- अध्यापन पद्धती व साधनांचा

वापर करत असतात. तसेच प्रत्येक स्वायत्त महाविद्यालयात स्थानिक स्तरावर स्वतंत्र निर्णय घेवून अंमलबजावणी केली जाते. त्याचबरोबर तेथिल विद्यार्थी व प्राध्यापक वर्षभर सतत कार्यरत राहतात.

**गरजः**

संलग्न महाविद्यालयांची संख्या जास्त झाल्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे, त्यामुळे महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबत महाराष्ट्र सरकारचा विचार आहे. तसेच युजीसीही महाविद्यायांना स्वायत्तता देण्याबाबत सकारात्मक आहे. अशावेळी अगोदरच स्वायत्त असलेल्या महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीचा अभ्यास केला तर महाविद्यालयांना स्वायत्त करायचे क ाय? या दृष्टीने अभ्यास करणे गरजेचे वाटते.

**उपयोगिताः**

स्वायत्तता घेण्यासाठी जास्तीत जास्त महाविद्यालयांनी स्वतः प्रयत्न करावेत असे युजीसी महाविद्यालयांना सुचविते. तसेच महाराष्ट्र शासनही महाविद्यालयांच्या स्वायत्ततेबद्दल अनुकूल आहे, पण तरीही महाराष्ट्रातील संलग्न महाविद्यालये स्वायत्त व्हावे की नाही ? अशा द्विधा विचारात आहेत. अशा महाविद्यालयांना योग्य निर्णय घेण्यासाठी मदत होईल.

**उद्दिष्टः**

१.महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीचा अभ्यास करणे.

**परिकल्पनाः**

१.महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील शिक्षणप्रणालीत विविधता असावी.

**संशोधन पद्धतीः**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

**नमुना निवडः**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील १५ स्वायत्त महाविद्यालये सहेतुक नमुना निवड पद्धतींनी निवडण्यात आली होती.


**संशोधन साधनेः**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली, प्राध्यापकांसाठी प्रश्नावली, विभागप्रमुखांसाठी प्रश्नावली, प्राचार्यांसाठी मुलाखत या स्वनिर्मित संशोधन साधनांचा वापर करण्यात आला होता.

**स्वायत्ततेचा प्रयोग महाराष्ट्रात यशस्वी होण्याविषयी विभागप्रमुखांच्या मताविषयी कोष्टक**

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | नक्कीच यशस्वी होईल | २१ | ७०.००% |
| २. | महाविद्यालयाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून | ०६ | २०.००% |
| ३. | सांगता येत नाही | ०३ | १०.६६% |
| | **एकूण** | **३०** | **१००.००%** |


वरील कोष्टकानुसार असे दिसून येते की, ७० टक्के विभागप्रमुखांच्या मते, स्वायत्ततेचा प्रयोग महाराष्ट्रात नक्कीच यशस्वी होईल.



**प्राध्यापकांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांबाबत माहीती दर्शविणारे कोष्टक**

| अ. क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | प्रशिक्षण | १५ | २०.०० % |
| २. | कार्यशाळा/परिषद/चर्चासत्र/ | ०८ | १०.६६ % |
| ३. | प्राध्यापक विकास कार्यक्रम | १५ | २०.०० % |
| ४. | उद्‌बोधन व प्रबोधन वर्ग | ०९ | १२.०० % |
| ५. | प्रकल्प | ०० | ००.०० |
| ६. | वरील सर्व | २८ | ३७.३३ % |
| | एकूण | ७५ | १००% |

वरील कोष्टकानुसार असे दिसून येते की, प्राध्यापकांच्या विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये कार्यशाळा//परिषद/चर्चासत्र/,प्राध्यापक विकास कार्यक्रम, उद्‌बोधन व प्रबोधन वर्ग, प्रकल्प हे सर्व उपक्रम राबविले जातात.




**निष्कर्षः**

१) ७३.८० टक्के स्वायत्त महविद्यालयातील प्रवेश प्रवेशपूर्व परीक्षेद्वारे दिले जाते.

२) १०० टक्के विद्यार्थांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात शासनाचे आरक्षित धोरण राबविले जाते.

३) १०० टक्के विद्यार्थांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात शासनाचे शिष्यवृत्ती धोरण राबविले जाते.

४) ६० टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रममाव्यतिरीक्त इतर कोर्स (अल्पकालावधी व प्रमाणपत्र) पूर्ण केले आहेत.

५) ५२ टक्के विद्यार्थांच्या मते, कायमस्वरुपी प्राध्यापक शिकविण्यासाठी उपलब्ध आहे.

६) ९० टक्के विद्यार्थांच्या मते, अध्ययन - अध्यापनाच्या अद्ययावत पद्धतींचा वापर केला जातो.

७) ६० टक्के विद्यार्थांच्या मते, प्राध्यापक आवश्यकतेनुसार व्याख्यान, स्पष्टीकरण, क्षेत्रअभ्यास, प्रकल्प, चर्चा, गटचर्चा, परिसंवाद, कार्यशाळा या सर्वच अध्यापन पद्धतींचा वापर करतात.

८) ३६ टक्के प्राध्यापकांच्या मते, पॉवरपॉइंट प्रझेंटेशन, ऑडिओ - व्हिडिओ व प्रकल्प या अध्यापन पद्धती विकसित केल्या आहेत.

९) ५२ टक्के विद्यार्थांच्या मते, अध्यापनासाठी दृक साधनांचा वापर केला जातो.

१०) ८३.३३ टक्के विद्यार्थांच्या मते, शिकवित असलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापनाबद्दल समाधानी आहेत.

११) ४० टक्के विद्यार्थांच्या मते, त्यांच्या मूल्यमापनासाठी सेमेस्टर व सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन पद्धतींचा वापर केला जातो.

१२) सर्वच विद्यार्थांच्या मते, शैक्षणिक दिनदर्शिकेची अंमलबजावणी केली जाते.

१३) ८२ टक्के विद्यार्थांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात मिळत असलेल्या अनुभवाबत समाधानी आहेत.

१४) ३० टक्के विद्यार्थांच्या मते,औद्योगिक व विषयतज्ज्ञ यांना गेस्ट लेक्चसाठी आमंत्रित केले जाते.

१५) ६६.६६ टक्के प्राध्यापकांच्या मते, त्यांच्या विषयांची शैक्षणिक दिनदर्शिका सहामाही प्रकारची आहे.

१६) ७६ टक्के प्राध्यापकांच्या मते, त्यांना अध्यापनाचे पूर्ण स्वातंत्र्य असते.

१७) सर्वच प्राध्यापकांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयात दृक, श्राव्य व दृकश्राव्य साधने उपलब्ध आहेत.

१८) ३७.३३ टक्के प्राध्यापकांच्या मते, प्रशिक्षण, कार्यशाळा, परिषद, चर्चासत्र, प्राध्यापक विकास कार्यक्रम, उद्‌बोधन व प्रबोधन वर्ग आणि प्रकल्प हे सर्व प्रयत्न प्राध्यापकांच्या विकासासाठी करण्यात येतात.

१९) ४४ टक्के प्राध्यापकांच्या मते, त्यांचे अध्यापनाचे दिवस २३० आहेत.

२०) ४२.६६ टक्के प्राध्यापकांच्या मते, त्यांच्या विषयांचा अभ्यासक्रम दर तीन वर्षांनी बदलण्यात येतो.

२१) ३६ टक्के प्राध्यापकांच्या मते, प्रशिक्षण, इंटरनेट, पुस्तके, मासिके, स्वायत्त महाविद्यालयांसोबत आंतरक्रिया, चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद याद्वारे अध्यापन पद्धतींची माहिती मिळते.

२२) ५३.३३ टक्के प्राध्यापकांच्या मते, विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापनामध्ये गृहपाठ, विषयचाचणी, दैनंदिन हजेरी व चर्चासत्राचा समावेश केला जातो.

२३) ४० टक्के प्राध्यापकांच्या मते, महाविद्यालयीन परीक्षेचा निकाल एक महिन्याच्या आत लागतो.

२४) ५३.३३ टक्के प्राध्यापकांच्या मते, वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती १०० टक्के असते.

२५) ७० टक्के विभागप्रमुखांच्या मते, त्यांच्या विभागात आंतरविद्याशाखेचे शिक्षण दिले जाते.

२६) ५० टक्के विभागप्रमुखांच्या मते, शैक्षणिक व इतर उपक्रमातील संपादणूकीत वाढ होत आहे.

२७) १०० टक्के विभागप्रमुखांच्या मते, इतर स्वायत्त महाविद्यालय व स्वतःचे स्वायत्त महाविद्यालय यामध्ये शैक्षणिक दिनदर्शिका, अभ्यासक्रम, अध्ययन - अध्यापन पद्धती, मूल्यमापन व नवोपक्रम यांमध्ये फरक आहे.

२८) ७० टक्के विभागप्रमुखांच्या मते, स्वायत्ततेचा प्रयोग महाराष्ट्रात नक्कीच यशस्वी होईल.

२९) १०० टक्के प्राचार्यांच्या मते, स्वायत्त महाविद्यालयातील कामकाज महाविद्यालयातील विविध समित्यांमार्फत चालते.

३०) ६६.६६ टक्के प्राचार्यांच्या मते, विद्यार्थी प्रवेशानंतर ब्रिजकोर्स घेतले जातात.

३१) ४० टक्के प्राचार्यांच्या मते, बदलता काळ व गरजा या बाबी अभ्यासक्रम अद्ययावत करताना लक्षात घेतल्या जातात.

३२) ४६.६६ टक्के प्राचार्यांच्या मते, अध्ययन सहज, सुलभ व पक्के होण्याच्या दृष्टीकोनातून अध्यापन पद्धती विकसित केली जाते.

**संदर्भ ग्रंथः**

१. भांडारकर, के. एम. (२०१०). सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणेः नित्यनूतन प्रक ाशन.

२. घोरमोडे, के. यु. आणि घोरमोडे, के. (२००६). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूरः विद्या प्रकाशन.

३. कांबळे ना. तु. (२०१३). उच्च शिक्षणापुढील आव्हाने, औरंगाबादः चिन्मय प्रकाशन.

४. मुळे, सं. ज्ञा. (२०११). शैक्षणिक संशोधनाची ओळख, नाशिकः इनसाईट पब्लिकेशन.

५. George, A. (2011). College Autonomy in India: Performance and Prospects, New Delhi: Authorspress Publishers Of Scolarly Book.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com